# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**<u>दिनांक 29/1/2015 (का.प.क्र.10) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.</u>**

गुरूवार दिनांक 29 जानेवारी 2015 रोजी (का.प.क्र .10) मा.सभापती श्री.विजय वाघचौरे यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दुपारी 12.35 वा वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.अति.आयुक्त श्री.रमेश पवार,नगरसचिव, श्री.एम.ए.पठाण व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.काशिनाथ हरीभाऊ कोकाटे
02. स.स.श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
03. स.स.श्री.अनिल श्रीकिशन मकरीये
04. स.स.श्री.सुरेंद्र माणिकराव कुलकर्णी
05. स.स.श्री.मिर हिदायत अली मिर बसालत अली
06. स.स.श्री.संजय सांडु चौधरी
07. स.स.श्री.जहांगीर खान अब्बास खान
08. स.स.सौ.प्रिती संतोष तोतला
09. स.स.सौ.सत्यभामा दामोधर शिंदे
10. स.स.सौ.उर्मिला नितीन चित्ते
11. स.स.श्रीमती फिरदोस फातेमा

श्री.संजय चौधरी : मागील बैठकीत चिकलठाणा येथील भोगवटा प्रमाणपत्र दिल्या प्रकरणी चौकशी करून या बैठकीत अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते त्या बाबतीत काय कार्यवाही केली. अधिकारी यांना प्रत्यक्ष जागेवर पाहणीसाठी पाठविले होते त्यांनी फोटो घेतले का,शुटींग केली का ? पंचनामा केला असेल आपणाकडे काय अहवाल दिला.

मा.सभापती : मागिल बैठकीत चिकलठाणा येथील पोल्ट्रीफार्म संदर्भात चौकशीचे आदेश दिले होते त्या संबधी काय चौकशी केली माहिती देण्यात यावी.

उपआयुक्त (श्री.पवार) :मौ.चिकलठाणा येथील गट क्र.408 येथील योगेश झव्हेरी यांचे जागेची स्थळ पाहणी करून वस्तुस्थिती दर्शक अहवाल देण्याचे आदेशीत केले होते त्यानुसार चौकशी केली असता बांधकाम व भोगवटा प्रमाणपत्र हे पोल्टी फार्म या व्यवसायासाठी देण्यात आले परंतु तेथे पोल्ट्री फार्म दिसुन आले नाही तेथे फोर्ड कंपनीचे सर्विस सेंन्टर शोंरूम कार्यरत आहे तेथील छायाचित्र व व्हिडीओ चित्रिकरण केले.स्थळ पाहणी करून पंचनामा केला मेझनाईन फ्लोअरचे 533.54 चौ.मीटर चे बांधकाम हे जास्त प्रमाणात होते 533.54 चौ.मीटर चे अतिरिक्त बांधकाम केल्या प्रकरणी रू.1,09,600/- दंड वसुल करून त्यांना भोगवटा प्रमाणपत्र हे पोल्ट्री फार्म या व्यवसायाकरीता देण्यात आले होते.स्थळ पाहणी केली असता तेथे पोल्ट्री फार्म दिसून आले नाही तेथे वाहनांचे वॉशींग सेन्टर , गाडयाचे सामान,सेल करण्यासाठी गोडाऊन तसेच कर्मचारी यांचेसाठी कार्यालयीन व्यवस्था असल्याचे दिसून आले.

श्री.जगदीश सिंध्द : माहिती दिली यावरून असे वाटते की ही मोठी गंभीर चुक आहे.फोर्ड कंपनीचे शोरूम लगेच तयार केलेले नाही जेंव्हा भोगवटा प्रमाणपत्र दयायचे होते त्यावेळी पाहणी केली त्यावेळी ते तयार केलेले असेल.ज्या अधिका-यांनी सर्वे केला त्यांचेवर कार्यवाही करावी.चौकशी होत राहिल या प्रकरणात मोठी चुक झालेली आहे.

श्री.मीर हिदायत अली :चौकशीचे आपण आदेश केले होते. अहवाल आला संबधीत अधिकारी यांनी खुलासा केला.मोठी चुक यात झालेली आहे.जे दोषी असेल त्यांचेवर कडक कार्यवाही करावी. कार्यवाही केल्यास पुढे असे प्रकार होणार नाही .

श्री.संजय चौधरी : आताच खुलासा केला की तेथे पोल्ट्री फार्म नसुन फोर्डचे सर्वीस सेंन्टर आहे.मागच्या बैठकीत अधिकारी यांनी चुकीचा खुलासा केला अधिकारी खोटे बोलून सभागृहाची,शहरातील नागरीकाची दिशाभूल करतात महापालिकेची बदनाम करतात. आठ दिवसापासून या प्रकरणात बातम्या येतात यात सर्व नगरसेवकाची पदाधिकारी यांची बदनामी होत आहे.या प्रकरणात मा.कोर्टाचे जैथे थे आदेश दिले असतांना, भोगवटा प्रमाणपत्र का दिले. संचालक नगररचना पुणे यांना मा.आयुक्ताच्या सहिने पत्र पाठविले त्यात मा.न्यायालयाच्या आदेशाचे उल्लेख केलेला होता का ?

सहा.संचालक (न.र) :त्या पत्रात मा.न्यायालयीन प्रकरणाचा उल्लेख केलेला नाही.

श्री.संजय चौधरी :पत्रात उल्लेख केला नाही तर ही चूक नाही का ?

मा.सभापती :भोगवटा प्रमाणपत्र देतांना रिवाईज परवानगी घेतली होती का ?

सहा.संचालक (न.र) :सुधारीत परवानगी घेतली नाही.

श्री.जगदीश सिध्द :ग्रीन झोन मधे हे प्रकरण आहे पोल्ट्री फार्म साठी परवानगी देऊ शकतो परंतु ग्रीन झ ोन मध्ये इतर कामासाठी बांधकाम परवानगी देऊ शकत नाही सर्वांना माहित आहे.असे असतांना भोगवटा प्रमाणपत्र दिले जाते जे या प्रकरणात दोषी असतील त्यांचेवर कडक कार्यवाही करावी.

मा.सभापती :रिवाईज नकाशा दाखल केला तेंव्हा भोगवटा प्रमाणपत्र हे मंजूर नकाशा प्रमाणेच असावे याचे विसंगत असलेले बांधकाम पाडून टाकावे अशी नोंद संचिकेत संबधीत अधिकारी यांनी घेतली का ?

सहा.संचालक(न र) :बांधकाम पाडल्याची नोंद या संचिकेत नाही.दुसरी संचिका प्रशासकीय अधिकारी यांचेकडे आहे त्यात असेल.

मा.सभापती :जी संचिका आहे त्यात पाडून टाकावे असे आपल्या अधिका-याने लिहिलेले आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे :सर्वसाधारण सभेत हा विषय चर्चेला आला.मा.न्यायालयाची स्थगिती, त्यानंतर सर्वसाधारण सभेत चर्चा झाली पुन्हा कार्यवाही केली त्यानंतर संचालक पुणे यांना पाठविलेले पत्र,त्यानंतर देण्यात आलेले भोगवटा प्रमाणपत्र या सर्व कार्यवाहीची क्रमवारी व ती संचिका कोठे गेली होती कुणाच्या सहया त्यावर आहे याची माहिती दयावी.

मा.सभापती :या प्रकरणात स्थगिती आदेश होते का ,विधी सल्लागार यांनी खुलासा करावा

विधी सल्लागार :सदरील प्रकरण सद्यस्थिती मा.उच्च न्यायालयात आहे.जैसे थे आदेश आहेत. जैसे थे ची परीस्थिती ठेवणे आवश्यक आहे. मा.न्यायालयामध्ये बांधकामाच्या संबधी महापालिकेने जी कार्यवाही प्रस्तावित केली होती.त्या कार्यवाहीच्या संबधाने ते कोर्टात गेल्यामुळे मा. न्यायालयाने सांगितले की आहे परीस्थिती कायम ठेवावी

श्री.संजय चौधरी :याचा अर्थ भोगवटा प्रमाणपत्र देता येत नाही.

विधी सल्लागार :बरोबर आहे, देता येत नाही.

मा.सभापती : संबधीतानी केलेले बांधकाम पाडले होते. मा.न्यायालयाचे स्थगीत आली त्यानंतर बांधकाम केंव्हा झाले जैसे थे आदेश असतांना भोगवटा प्रमाणपत्र देता येते का?

श्री.काशिनाथ कोकाटे : कार्यवाही करणे प्रशासनाचा भाग आहे. भोगवटा प्रमाण पत्र दिले त्यास स्थगिती दयावी नंतर सर्व माहिती घ्यावी.

श्री.जगदीश सिध्द :यापूर्वी फोर्डचे शोरूम होते श्री.झनझन यांनी बांधकाम पाडले तेंव्हा ही शोरूमच होते,आताही तेच आहे.अधिकारी यांनी भेट दिली ते सांगतात शोरूम आहे जे झाले ते चुकीचे झाले तेथे बांधकाम परवानगी देता येत नाही.संपूर्ण बांधकाम पाडले असते तर पुढील हा प्रकार झाला नसता आता कुणासही पाठीशी घालवू नये कार्यवाही करावी.आता चौकशी करण्याची गरज नाही.गंभीर प्रकरण झाले.या प्रकरणात स.सदस्य यांना तुरुंगात जावे लागते हे बरोबर नाही. दोन वर्षापासून हे प्रकरण चालू आहे. संबधीतावर निलंबणाची कार्यवाही करावी.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :खुलासा आलेला आहे. कार्यवाही करावी.

या वेळी कार्यवाही करावी अशी मागणी अनेक स.सदस्य करतात.

श्री.जगदीश सिध्द :ज्यांना चौकशीला पाठविले त्यांनी स्पष्ट म्हटले की तेथे फोर्ड कंपनीचे शोरूम आहे. सर्व माहिती असतांना जाणून बूजून भोगवटा प्रमाण दिले गेले. जे दोषी आहे त्यांचेवर कार्यवाही करावी.

मा.सभापती :भोगवटा प्रमाणपत्र देणेपुर्वी विधी सल्लागार यांचा संचिकेवर अभिप्राय घेतला का?

विधी सल्लागार :अभिप्रायासाठी संचिका माझ्याकडे आलेली नाही.

मा.सभापती :भोगवटा प्रमाणपत्र देतांना संबधीताकडून 100 रू स्टॅम्प पेपरवर काय लिहून घेतले ते वाचून दाखवावे.

सहा.संचालक (न.र) : अंडर टेकींग बॉण्डवर दिलेले आहे की ,(इंग्रजीतून वाचून दाखवतात)

श्री.संजय चौधरी :मराठीतून वाचून दाखवावे.

सहा.संचालक(न.र ) :थोडक्यात असे की ज्या परपज साठी परवानगी दिली त्याच परपज साठी मी वापर करेल असे शपथेवर सांगतो

श्री.काशिनाथ कोकाटे :ज्या उद्देशासाठी बांधकाम परवानगी दिली तो उद्देश तेथे साध्य होतो की नाही हे पाहणे गरजेचे होते. परवानगी नुसार तेथील काम केलेले नसेल उल्लंघन होत असेल तर कार्यवाही करता येते की नाही ?

मा.सभापती :बांधकामात बदल केला तर काय कार्यवाही करू शकतो.

सहा.संचालक(न.र ) :महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 चे कलम 52 नुसार वापर बदलला असेल तर गुन्हा दाखल करू शकतो.

श्री.जगदीश सिध्द :मा.कोर्टाचे आदेश जैसे थे ठेवण्याचे आहे. यात अधिकारी यांनी चुक केली आहे त्यांचेवर कार्यवाही करावी.

मा.सभापती :या इमारतीला कर आकारणी केली का ?

कर निर्धारक व संकलक:दि.25-5-2011 ला खुल्या जागेची 17489 रू कर आकारणी झाली त्यानंतर 2012-13 मध्ये बांधकाम झाल्यानंतर 1-4-2012 पासून रूपये 1,34,524 कर आकारणी केली.भोगवटा प्रमाणपत्र दिल्यानंतर कर आकारणी झाली नाही तो कर 4,15,713 रू आहे.

मा.सभापती :23-12-2014 रोजी कराच्या बाबतीत काय दुरूस्ती केली.

| | |
|---|---|
| कर निर्धा. संकलक | :अलीकडच्या काळात दुरूस्ती केली नाही.रूपये 1,34,524 मंजूर झालेली नाही 23-12-2014 च्या नंतर रूपये 4,15,713 टॅक्स असेल. |
| श्री.मीर हिदायत अली | :रूपये 4,15,713 /- हा वार्षीक टॅक्स आहेत का ? |
| कर निर्धा. व संकलक | :हा वार्षीक टॅक्स आहे. कर लावणे बाकी आहे अंडरप्रोसेसमध्ये संचिका आहे.मा.आयुक्तांना अधिकार आहे संचिका मंजूरीसाठी जाईल. |
| श्री.संजय चौधरी | : कर आकारणी करतांना पोल्ट्री फार्म म्हणून लावला की शोरूम म्हणून लावला. |
| कर निर्धा व संकलक | :यापुर्वी जे अधिकारी होते त्यांनी हा टॅक्स आकारलेला आहे. माझे कडे चार्ज आल्यानंतर रूपये 4,15,713 हा टॅक्स आकारला जाणार आहे. |
| मा.सभापती | :4.15 लक्ष टॅक्स आकारणार आहे तेथील स्थळ पाहणी केली का ? |
| कर निर्धा.व संकलक | :वार्ड अधिकारी स्थळ पाहणी करतात. |
| श्री.जगदीश सिंध्द | :परवानगीचा व टॅक्सचा काही संबध येत नाही. |
| श्री.काशिनाथ कोकाटे | : शहर वाढीसाठी औद्योगिक कारणसाठी शेतक-यांच्या जमिनी भुसंपादीत केल्या ज्या शिल्लक आहे त्यांना पोल्ट्री फार्म साठी परवानगी देणार का ? |
| श्री.जगदीश सिध्द | :परवानगी देणे व कर लावणे याचा संबध नाही.जेथे घर तेथे कर लागतो. |
| मा.सभापती | :4.15 लक्ष कर आकारला तेव्हा तेथील पाहणी केली होती का ? |
| कर निर्धा.व संकलक | :व्यावसायिक कर आकारला आहे. |
| श्री.संजय चौधरी | :लपवून ठेवण्यासारखे यात काही नाही. सर्व खुलासा झाला कार्यवाही करण्याचे आदेशीत केले. |
| श्रीमती प्रिती तोतला | :जे कुणी यात दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही करण्याचे मा.आयुक्तांना आदेशीत करावे. |
| श्री.जगदीश सिध्द | :निलंबण करण्याची शिफारस हे सभागृह करू शकते.सभागृहाला अधिकार आहे. |
| श्री.सुरेंद्र कुलकर्णी | :दिलेले भोगवटा प्रमाणपत्र चुकीचे मार्गाने दिले ते रद्य करावे व जे दोषी असेल त्यांचेवर कार्यवाहीचे आदेशीत करावे. |
| मा.सभापती | :भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले त्या जागेची पाहणी करून चौकशीचे आदेशीत केले होते. संबधीत अधिकारी यांनी स्थळ पाहणी केली परंतु समाधानकारक उत्तर अदयाप मिळाले नाही ती संचिका कोणकोणत्या विभागात गेली कोणत्या अधिका-यांचे त्यात सबमिशन,सहया आहे या संचिकेची पुर्नतपासणी मुख्य लेखा परीक्षक श्री. थत्ते यांनी करावी व तसा अहवाल पुढील बैठकीपर्यत सादर करावा त्यानंतर कार्यवाही बाबत निर्णय घेतला जाईल. |
| श्री.संजय चौधरी | :भोगवटा प्रमाणपत्र रद्य करावे. चौकशी व अधिका-यावर कार्यवाही नंतर होईल. |
| मा.सभापती | :चौकशीचा अहवाल मागितला आहे सर्व कार्यवाही करता येईल. |

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

| | |
|---|---|
| श्री.जगदीश सिध्द | :निलंबन करण्याचे अधिकार आहे किंवा नाही विधी सल्लागार यांचा खुलासा घ्यावा. |
| मा.सभापती | :या प्रकरणात नियमाप्रमाणे जी कार्यवाही करता येईल ती करावी. |

या वेळी स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

| | |
|---|---|
| श्री.काशिनाथ कोकाटे | :निलंबणाची कार्यवाही करण्याची शिफारस करावी तोपर्यत भोगवटा प्रमाणपत्र स्थगिती दयावी. |
| श्री.अनिल मकरिये | :स्थागित नको रद्य करावे. |

श्री.संजय चौधरी :या प्रकरणात चुक झाली, न्यायालयाचे जैसे थे आदेश आहे. हे सिध्द झालेले आहे भोगवटा प्रमाणपत्र देता येत नाही.

मा.सभापती :चौकशी अहवाल समोर येत नाही तोपर्यंत भोगवटा प्रमाणपत्रास स्थगिती देण्यात येते.

श्री.जगदीश सिध्द :अधिकारी यांना पाठीशी घालू नये. कार्यवाही व्हावी.ज्यांना चौकशीसाठी जागेवर पाठविले होते त्यांचा खुलासा,अहवाल आलेला आहे आता कोणती चौकशी करणार आहे.निर्णय घ्यावा.

मा.सभापती :या प्रकरणी मा.न्यायालयात प्रकरण आहे विधी सल्लागार यांनी खुलासा करावा.

श्री.जगदीश सिध्द :मा.न्यायालयात प्रकरण असतांना भोगवटा प्रमाणपत्र दिले आता कसला विचार करता , रद्द करावे.

या वेळी स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.मीर हिदायत अली :विधी विभागाचा अभिप्राय न घेता भोगवटा प्रमाणपत्र दिले. एका संरक्षीत भितीचे भोगवटा प्रमाणपत्रासाठी 5 वेळेस संचिका विधी विभागाकडे अभिप्रायासाठी गेली या प्रकरणात तसे का झाले नाही. यात चुकीचे काम केलेले आहे सहकार्य करू नये नसता यानंतर मोठे चुकीचे अशी प्रकरण होईल. प्रशासनाला आदेशीत करावे भोगवटा प्रमाणपत्र रद्द करावे.

श्री.जगदीश सिध्द :जे दोषी आहे त्यांना निलंबीत करावे. नंतर चौकशी होत राहिल.

मा.सभापती :नगररचना विभागाने खुलासा करावा की या प्रकरणात काय कार्यवाही करता येईल.

श्री.काशिनाथ कोकाटे :आताच खुलासा झाला की कुकूटपालन साठी परवानगी दिली होती तेथे कुकूट पालन नाही.चौकशी अहवाल येईल परवानगी दिली त्यात अनियमितता झाली आहे भोगवटा प्रमाणपत्र रद्द करण्याची शिफारस प्रशासनाकडे करावी.

मा.सभापती : पोल्ट्री फार्म साठी भोगवटा प्रमाणपत्र दिले होते ते तेथे नसेल तेथे दुसरे उद्देशासाठी काही उघडले असेल तर ते भोगवटा प्रमाणपत्र रद्द करता येईल का ते पाहावे.

श्री.जगदीश सिध्द :परवानगी दिली त्यालाच जैसे थे आदेश आहे. पुढे भोगवटा प्रमाणपत्र देऊ शकत नाही. दिले असेल तर रद्द करावे.अधिका-यावर कार्यवाही करण्याची शिफारस करावी.

मा.सभापती :स्थळ पाहणी केल्याचा अहवाल सादर केला आहे.

श्री.मीर हिदायत अली :आजपर्यंत जैसे थे आदेश आहे की विड्रॉल करण्यात आले.

मा.सभापती :अहवाल आलेला आहे तो वाचून दाखवावा.

उपआयुक्त (श्री.पवार) :केलेला पंचनामा असा की आम्ही खालील सही करणार श्री.आर एन संधा भोगवटा कक्ष प्रमुख, डॉ.आशिष पवार उपआयुक्त मनपा,श्री.शिवाजी झनझन,कर निर्धारक व संकलक तथा मुख्य अग्निशमन अधिकारी तथा मुख्य पदनिर्देशित अधिकारी, श्री.महावीर पाटणी, पदनिर्देशित अधिकारी पंचनामा करीत आहोत.

आज दिनांक 22-1-2015 रोजी मा.स्थायी समिती सभेमध्ये स.नगरसेवक श्री.संजय चौध्ररी व इतर सदस्य यांनी श्री.योगेश विठ्ठलभाई जव्हेरी यांना मौजे चिकलठाणा गट नंबर 408 या जमिनीवर देयात आलेले भोगवटा प्रमाणपत्र हे चुकीचे दिलेले आहे त्यावर कार्यवाही करावी असे प्रश्न उपस्थित केले त्या अनुषंगाने मा.स्थायी समिती सभापती यांनी बैठकीत झालेल्या मुद्दा बाबत त्वरीत स्थळपाहणी करून सत्य वस्तुस्थिती दर्शक अहवाल देण्याचे आदेश दिले.

त्यानुसार मा.अतिरिक्त आयुक्त यांनी आदेशित केल्यानुसार उपआयुक्त व कर निर्धारक व संकलक तथा मुख्य पदनिर्देशित अधिकारी पदनिर्देशित अधिकारी व मी स्वत: जायमोक्यावर जाऊन पंचनामा करून पाहणी केलेली आहे.

श्री.योगेश विठ्ठलराव जव्हेरी मौ.चिकलठाणा गटनंबर 408 येथील जमिनीवर पोल्ट्री फार्म म्हणून बांधकाम परवानगी देयात आली आहे त्याच धरतीवर भोगवटा प्रमाणपत्र देयात आले होते त्या जागेचे एकूण बांधकाम क्षेत्रफळ 8100 चौ.मी. व्यवसायिक वापर 1336.83 चौ.मी ला बांधकाम परवानगी देयात आली होती परंतु भोगवटा प्रमाणपत्रासाठी त्यांनी प्रस्तावित 1870.26 चौ.मी सादर केले आहे त्यांनी प्रत्यक्ष स्थळावर 533.43 चौ.मी जास्तीचे बांधकाम केलेले आहे सदर बांधकाम हे मॅजेनिन फ्लोअरचे बांधकाम हे जास्त प्रमाणात आहे बांधकाम देय मर्यादित असल्याने दंडात्मक कार्यवाही करून एकुण दंड रूपये 1,90,600/- भरून घेण्यात येऊन भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले होते परंतु प्रत्यक्ष पाहणीत त्या ठिकाणी वापर हा फोर्ड मोटार कंपनी सव्हिसेस सेंटर करिता तसेच तेथील कर्मचारी यांच्यासाठी कार्यालय व वाहन साहित्य गोडावून करिता वापर सुरू असल्याचे निर्देशनास आले स्थळ पाहणी केली व तेथील व्हिडीओ चित्र्ीकरण करण्यात आले असून सदर चित्रीकरण (सि.डी)सोबत देण्यात येत आहे.

श्री.मीर हिदायत अली :आताच वाचन केल्याप्रमाणे दंडात्मक रक्कम रूपये 1.90,600 भरणा करून घेतले का?

उपआयुक्त (श्री.पवार) :संचिकेत तशी नोद आहे.

श्री.अनिल मकरिये :संबधीतावर कार्यवाही करावी.

सहा.संचालक (न र ) :महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम चे कलम 143 ई आपणा समोर सादर करू इच्छितो की, (इंग्रजी मध्ये वाचून दाखवितात)याचा अर्थ थोडक्यात असा की, कुठलेही ऑफेन्स रजिस्टर्ड केले असेल कस्टडीमध्ये जरी असेल आणि तो ऑफेन्स ज्याला ऑथरेटी दिलेली आहे म्हणजे मा.आयुक्तांना आणि ते दंड लावून रेग्युलर होत असेल तर तो ऑफेन्स रद्य म्हणून समजला जातो.

श्री.काशिनाथ कोकाटे :कंपाऊडींगच्या नावाखाली कलम 143 चा पाहिजे तसा उपयोग करता येतो हे सर्व नियमात बसवून दंड लावून सर्व कार्यवाही केली.ज्या उद्देशासाठी परवानगी दिली होती त्याचे उल्लघंन केलेले आहे एम आर टी पी ॲक्स 1966 चे कलम 52 नुसार कार्यवाही करण्याचे सुचित करावे.

श्री.संजय चौधरी :भोगवटा प्रमाणपत्र रद्य करावे. जे दोषी असेल त्यांचेवर कार्यवाहीची शिफारस करावी.

मा.सभापती :या प्रकरणात मुख्यलेखा परीक्षक यांनी त्या संचिकेची संपुर्ण तपासणी करून मा.आयुक्ताकडे अहवाल सादर करावा व यात जे दोषी असेल त्यांचेवर प्रशासनाने निलंबणाची कार्यवाही करावी.

श्री.मीर हिदायत अली :दिं.19-7-2014 रोजी स्थायी समिती ठराव क्र 22 नुसार मुळे ब्रदर्स संबधी मोबदला देण्याचा ठराव होता चर्चा होऊन 900 मालमत्तास स्थगिती दिली होती परंतु आता या प्रकरणात परवानगीस स्थगिती दिली की रेग्यूलर करण्यात आले.विकास निधी रू.1,58,13,720 भरणा करून घ्यायचे होते ते अदयाप घेतले नाही.त्या ठिकाणी ऑलरेडी दुकाने होऊन मार्केट झाले आहे.

| | |
|---|---|
| सहा.संचालक (न.र) | :संबधीताने बांधकाम परवानगीसाठी संचिका दाखल केली होती.बाधकाम संचिका मंजूरीच्या वेळी जे बाधीत कामाचा मोबदला दयायचा होता त्या मोबदल्यामधून जे पैसे बांधकाम परवानगीसाठी भरायचे होते ते वळती करून उरलेले रक्कम दयावीत अशी त्यांची मागणी होती.त्यानुसार स्थायी समिती समोर प्रस्ताव ठेवण्यात आला होता.प्रस्ताव स्थगित केल्यानंतर त्यानी बांधकाम परवानगी घेतली नाही |
| श्री.मीर हिदायत अली | :बांधकाम परवानगी दिली नाही परंतु इमारतीचे पुर्ण काम झाले मार्केट चालू झाले दुकाने तयार केली.जेव्हा रस्त्यासाठी जागा लागेल तेंव्हा पुर्ण 900 मिळकती भुसंपादीत होईल दोनच मिळकतीचे पजेशन घेणार नाही. त्यांचेकडून 1.58,13720 रू भरणा करून घ्यायला पाहिजे होते. |
| सहा.संचालक(न.र) | :जी बांधकाम परवानगी मागितली होती तेथे बांधकाम झालेले नाही. |
| श्री.मीर हिदायत अली | :19-7-14 पासून मी 5 पत्र दिले संचिकेची माहिती दिली नाही. |
| मा.सभापती | :लेखी स्वरूपात स.सदस्य यांना माहिती दयावी. |
| श्रीमती प्रिती तोतला | :स्थायी समिती म्हणजे काय व तिचे अधिकार काय ?या समितीच्या निर्णयाची अमलबजावणी करणे प्रशासनास बंधनकारक आहे का ? |
| श्रीसंजय चौधरी | :स्थायी समितीच्या निर्णयाची अमलबजावणी होते का ? |
| नगरसचिव | :महाराष्ट्र महानगरपालिका अधिनिमामध्ये वेगवेगळया तरतुदी दिल्या आहे.स्थायी समितीने घेतलेला निर्णय कलम 56 (2 ) नुसार त्या प्रकरणात दिले आहे ते बंधनकारक आहे.मालमत्ता विनियोग बाबत कलम 77,78,79 मध्ये दिले आहे मालमत्ताचा विनियोग कसा करायचा हे स्थायी समितीला अधिकार आहे.अस्थायी कर्मचा-यांना मुदतवाढ देणे,अशा ॲक्ट मध्ये अनेक प्रोव्हीजन आहे. पुर्ण माहीती देण्यास वेळ लागेल स.सदस्या यांना प्रत दिली जाईल. |
| श्रीमती प्रिती तोतला | :आताच म्हटले स्थायी समितीचा निर्णय बंधनकारक आहे 2-3 महिण्यापुर्वी अनुकंपा भरतीचा विषय चर्चेला आला व जो पर्यंत या प्रकरणी स्थायी समिती समोर अहवाल येत नाही तोपर्यत भरती प्रक्रिया करू नये असे आदेशीत केले. असे असतांना आजच्या दैनिक लोकमत मध्ये लाड समितीच्या माध्यमातून अनुकंपा भरती होत असल्याचे म्हटले. स्थायी समितीचे आदेश असतांना ही भरती प्रक्रिया का होत आहे  दिनांक 22-2-2010 ते 2014 पर्यंत 218 कर्मचारी नियुक्त केले व 22 लोकांच्या ऑर्डर तयार आहे ही भरती प्रक्रिया कुणाच्या आदेशानुसार होत आहे.माहिती घ्यावी. |
| उपआयुक्त(महसूल) | :मागील वेळेस भरती संदर्भात चर्चा होऊन मुख्य लेखा परीक्षक यांना चौकशीचे आदेश दिले होते चौकशी चालू असेल,पेपरला जे बातमी आली त्या संदर्भात संबधीतांना सुनावणीसाठी तारीख दिली आहे ही प्रक्रिया चालूच राहणार आहे भरतीचा विषय येत नाही. |
| मा.सभापती | :लाड समितीच्या किती संचिकेची चौकशी केली. उपआयुक्त महसूल कडून किती संचिका मुख्य लेखा परीक्षक यांचेकडे दिल्या. |
| श्रीमती प्रिती तोतला | :श्रीमती वयजंती शिदे हया स्वेच्छा निवृत्त झाल्यानंतर श्री. सय्यद अफजल यांना नातेवाईक सागूंन कसे नोकरी आपण घेवू शकता खुलासा करावा.पैशाची घेवाण देवान करून कामावर घेत असेल तर स्पष्ट सांगावे. |
| मा.सभापती | :मुख्य लेखा परीक्षक यांचेकडे किती संचिका चौकशीसाठी आल्या माहिती दयावी. |

मुख्य लेखा परीक्षक :आदेशीत केल्यानुंसार 218 संचिका पैकी 145 संचिका आलेल्या आहे छानणी चालू आहे उर्वरीत संचिका प्राप्त झाल्या नाही.

श्री.मीर हिदायत अली :यापुर्वीही पॅचवर्क विषयावर चर्चा झाली. 15-20 ेटीच्या संचिका गायब आहे.लाड समिती भरती प्रकरणाच्या 145 संचिका दिल्या 73 संचिका का दिल्या नाही सभागृहाचे आदेश पाळले जात नाही.

श्रीमती प्रिती तोतला :आपला निर्णय बंधनकारक आहे तीन दिवसात अनुकंपा भरतीचा अहवाल मागवावा.तोपर्यत ही भरती थांबविण्यात यावी. जे खरे वारसदार आहे त्यांचेवर अन्याय होऊ नये.

मा.सभापती :तीन दिवसात सर्व संचिका संबधीत अधिकारी यांनी चौकशीसाठी मुख्य लेखा परीक्षक यांचेकडे दयाव्यात. ज्या 145 संचिका दिलेल्या आहे त्याचा अहवाल मुख्य लेखा परीक्षक यांनी पुढील सभेत सादर करावा.चौकशी जोपर्यत होत नाही तोपर्यत ही भरती प्रक्रिया करू नये, केल्यास संबधीतावर प्रशासनाने कार्यवाही करावी.

श्रीमती फिरदोस खान :तत्कालीन आयुक्त श्री. कांबळे साहेब यांनी शिक्षण विभागावर जास्तीत जास्त लक्ष दिले 10 वीच्या वर्गात शिक्षण घेणारे विदयार्थ्यासाठी त्यांनी पारीतोषीक योजना सुरू केली.त्यामूळे 80 टक्के निकाल लागला होता. या विभागाचा प्र.चार्ज दिलेला आहे कायमस्वरूपी शिक्षणाधिकारी नाही. त्यामूळे शैक्षणिक दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने कायमस्वरूपी शिक्षणाधिकारी असावे या वर्षीचा निकाल 30-35 %वर येऊ शकतो तसेच शैक्षणीक वर्ष संपण्या अगोदर शिक्षकाची बदली करू शकतो का ?

श्री.मीर हिदायत अली :शिक्षणाधिकारी निवृत्त झाले. मा.आयुक्त श्री. कांबळे साहेब स्वत: शाळेकडे व्हिजीट देत असत त्यामूळे शिक्षक व विदयार्थ्यामध्ये शिक्षण क्षेत्रात जिद्द निर्माण झाली होती.विदयार्थ्यासाठी प्रोत्साहन पर बक्षीस देण्याचे जाहीर करावे जे की विदयार्थामध्ये अभ्यासाची गोडी निर्माण होऊन निकाल चांगला लागेल- खाजगी संस्थेच्या शाळेतील विदयार्थी मनपाच्या शाळेत प्रवेश घेत आहे.तसेच सेवा जेष्ठतेनुसार जे मुख्याध्यापक असतील त्यांना शिक्षणाधिकारी पदाचा चार्ज देण्यात यावा.

उपआयुक्त(श्री.जाधव) :शिक्षणाधिकारी पद तीन महिण्यापासून रिक्त असून शासनाकडे या पदावर अधिकारी दयावेत प्रस्ताव दिलेला आहे अदयाप कुणीही अधिकारी दिलेले नाही मनपाच्या शाळेतील जेष्ठतेनुसार जे मुख्याध्यापक असतील त्यांना तात्पुरत्या स्वरूपात या पदावर नेमणुक करावी असा प्रस्ताव आस्थापना -1 कडे पाठविलेला आहे.

श्रीमती फिरदोस फातेमा खानः ज्याचेकडे अगोदर जास्त काम असते अशा अधिका-याकडे शिक्षण विभागाचा चार्ज दिला जातो त्यामुळे या विभागाचे कामाकडे दुर्लक्ष होते.रहेमानिया कॉलनी शाळेतील शिक्षक श्रीमती म्हस्के यांची शैक्षणिक वर्ष संपण्या अगोदरच बदली का करण्यात आली.

उपआयुक्त(श्री.जाधव) :काही शिक्षक सेवानिवृत्त होतात व काहीच्या विनंती अर्जानुसार त्या त्या शाळेवर शिक्षक नियुक्त करीत असतो.

श्रीमती फिरदोस फातेमा खान:सर्वाच्या विनंती नुसार बदल्या करणार काय ज्याची बदली केली त्या वर्गासाठी कोण वर्ग घेणार आहे.

मा.सभापती : या शाळेतील विदयाथ्याचे शैक्षणिक नुकसान होणार नाही तेथे तातडीने शिक्षक नियुक्त करावे शिक्षक शिकवित नसेल .मुलाचे नुकसान होत असेल अशा शिक्षकाच्या बदल्या कराव्यात.सेवाजेष्ठतेनुसार मुख्याध्यापकामधून शिक्षणाधिकारी पदाचा चार्ज देण्यात यावा.

श्री.संजय चौधरी :विदर्यार्थी संख्येला अनुसरून शिक्षकाची पद निश्‍चिती केली जाते.तसे मनपात होत नाही.अनेकाच्या नियुक्त्या हया ओळखीने मनमानी पणे जवळच्या शाळेवर शिक्षकाच्या नियुक्त्या झालेली दिसून येतात.शिक्षण सभापती असतांना 73 शाळांना भेटी दिल्या. जिल्हा परीषदेच्या शाळेत 500 विदयार्थी असेल तर एक क.लिपीक व एक शिपाई असतात मनपाच्या एका शाळेत 35 विदयार्थी असतांना चार शिक्षक व पाच शिपाई नियुक्त असल्याचे दिसून आले.त्यापैकी 3 शिपाई शाळेत हजर नसतात काही राजकारणी आहे.अनेक कर्मचारी काम न करता त्यांना पगार मिळातो मसनतपूर शाळेत एक शिक्षक 1 वर्षापासून गैरहजर आहे. त्यांचा अर्ज नाही रजा नाही शाळेत येत नाही ते का येत नाही कोणी ही विचारणा करीत नाही. बाहेरील शिक्षक समावेश करून घेतले जातात अनेक शिक्षक अतिरिक्त ठरले त्यावर चर्चा झाली परतु कार्यवाही काहीच नाही.दीड दोन महिण्यापुर्वी जि.प. कडून 62 शिक्षकाची यादी आली व त्यांना समावेश करून घ्यावे असे म्हटले त्या बाबतीतही खुलासा व्हावा.

उपआयुक्त (श्री.जाधव):मनपाची आर्थीक परीस्थिती बरोबर नसल्यामूळे या अतिरिक्त शिक्षकांना समावेश करता येत नाही असे कळविले आहे.

श्री.संजय चौधरी :योग्य निर्णय घेतला अभिनंदन , 1-2-4 असे मिळून जवळपास 24 शिक्षक मनपा घेतले त्याचा बोजा महापालिकेवर येतो. सर्व शाळेची विदयार्थी संख्या विचारात घेवून शिक्षक नेमावे जेथे गरज आहे तेथे शिक्षक दयावे एका शाळेत 700-800 विदयार्थी संख्या असतांना शिपाई नाही. प्रशासनाने योग्य निर्णय घ्यावा जेथे गरज आहे तेथे कर्मचारी दयावे.

श्री.फिरदोस फातेमा खान:ज्या शिक्षकाची बदली केली त्याचे जागेवर तीन दिवसात शिक्षक दयावे नसता तासिका बेस वर असलेले शिक्षक नियुक्त करावे.

मा.सभापती :ताबडतोब त्या शाळेत शिक्षक उपलब्ध करून दयावे.

श्री.जहागीर खान :कटकटगेट टाईम्स कॉलनी जवळील नाल्याच्या जागेवर अतिक्रमण होऊन प्लॉटीग होत आहे जागा विकत आहे. कार्यवाही होत नाही.

प्रशासकीय अधिकारी :टाईम्स कॉलनीमध्ये मी स्वत: पाहणी केली तेथील नाल्याची साफसफाई केली प्लॉटींग संदर्भात संबधीतावर गुन्हा दाखल करण्याचे सुचना दिल्या आहे.यापुढे एकही प्लॉट पडणार नाही. असेल तर ते कार्यवाही होईल खाम नदीत 7-8 घरे इलिगल पत्र्याचे झालेली आहे नोटीस दिली आहे नोटीसची जसजशी मुदत संपेल त्यानुसार कार्यवाही हाईल.

श्री.जहागीर खान :कटकट गेटच्या बाजूला हॉटेल आहे तेथे रोटी तयार करतात धुराने गेट काळा होत आहे.

प्रशासकीय अधिाकरी :या बाबतीतही कार्यवाही केली जाईल.

श्री.अनिल मकरिये :पैठण गेट भागात 50 नवीन टप-या लागलेल्या आहेत 10-12 पत्र दिले कार्यवाही होत नाही तसेच लोकमान्य टिळक सभागृहासमोर एका व्यक्तीने मनपाच्या जागेवर ताबा घेतला कार्यवाही का होत नाही.

प्रशासकीय अधिकारी :सर्वात जास्त कार्यवाही या भागात केली दोन गाडया टप-या व इतर साहित्य उचलून आणले. पुन्हा असेल तर सध्याकाळ पर्यत कार्यवाही होईल.

श्री.अनिल मकरिये :किशोर कन्ट्रक्शन , कांतिलाल जैन , व समीर पदमाकर मुळे यांचे बांधकाम चालू आहे या भागातील नागरीकांची तक्रार आहे की हे बांधकाम चुकीचे होत आहे.तेथे साईड मार्जीग व पार्कीग नाही खुलासा करावा.

सहा.संचालक (न र) :स्थळ पाहणी करून पुढील बैठकीत अहवाल सादर केला जाईल.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :गजानन महाराज मंदीर ते सुतगिरणी चौक रस्त्यावरील अतिक्रमण काढले होते आता पुन्हा झाले.

प्रशासकीय अधिकारी :तेथील रस्त्यावरील 02 ट्रक सामान झाले जमा केले आहे.

मा.सभापती :पुन्हा अतिक्रमण केले असेल तर कार्यवाही करावी.

श्री.जगदीश सिध्द :वसंतभुवन,शहांगज औरंगपुरा भाजी मंडई व इतर ठिकाणी महापालिकेने बीओटी प्रकल्प राबविण्यास दिले. करारनामा झाला. प्रकल्पाचा कालावधी माझ्या माहिती प्रमाणे संपलेला आहे सर्व जागा महत्वाच्या व बाजारपेठ मध्ये येतात ?या ठिकाणी बीओटीवर काम देतांना करारनामा काय झाला किती कालावधी दिलेला होता.किती बांधकाम करणार आहे सर्व माहिती देण्यात यावी.

मा.सभापती : बीओटीचे किती प्रकल्प दिले कामास सुरूवात केंव्हा केली, काम पुर्ण केंव्हा होणार त्या जागा मनपाच्या मालकीच्या आहेत का?

कार्य.अभियंता(बीओटी) :वसंतभुवन, शहागंज, औरंगपुरा येथील प्रकल्पास 18-18 महिण्याचा कालावधी दिला होता तो संपलेला आहे औरंगपूरा, व शहांगज येथील प्रकल्पाच्या जागेच्या संदर्भात प्रकरण कोर्टात आहे.औरंगपूरा भाजी मंडईचे 140 लोक आपल्याकडे आले त्यांना स्थायीक महात्मा फुले भाजी मंडई येथे जागा दिली. उर्वरीत 32 दुकाने होती त्यातील 18 लोकांना जागा दिली 6 लोक बाकी आहे त्यांचेशी शेवटच्या आडवठयात लोक अदालत मध्ये तडजोड केली एक आडठवडयात औरंगपूरा येथील बीओटीचे काम सुरू होईल. वसंतभुवन येथील काम सुरू आहे.येथे ग्राऊंड फ्लोअरच्या खाली तीन फ्लोअर पर्यंत काम करायचे शहागंज येथील बीओटीचे प्रकरण न्यायालयात आहे. पीआर कार्ड मनपाच्या नावावर आहे.

श्री.जगदीश सिध्द :वसंतभुवन येथील कामाची मुदत संपलेली आहे काम पुर्ण केले नाही.असे होत असेल तर संबधीतास दंड आकारु शकतो, किंवा ते काम रद्य करू शकतो का? करारनाम्यात काय नमूद आहे.

कार्य.अभियंता(बीओटी) :करारनाम्याची प्रत सर्व सदस्यांना दिली जाईल.

श्रीमती प्रिती तोतला :करारा नुसार 18 महिण्याची मुदत संपली. दंडात्मक कार्यवाही केली का, केली नसेल तर का केली नाही व करणार असेल तर कोणत्या स्वरूपात माहिती दयावी.

कार्य.अभियंता(बीओटी):वसंतभुवनचे काम चालू आहे.काम करण्यास अडचण येते.पावसाळयात तेथे काम करू शकत नाही.

श्री.जगदीश सिध्द : काम देणे अगोदर पाहणी केली नव्हती का ? 18 महिण्याची मुदत दिली काम पुर्ण केले नियमाचे संबधीताने उल्लघंन केलेले आहे की नाही.

कार्य.अभियंता(बीओटी):नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाईल. करारनाम्याची प्रत सदस्यांना देण्यात येईल.

श्री.जगदीश सिध्द :रॅम्की, एएमटी , एजन्सी जसे काम सोडून गेले तसे या प्रकल्पाचे होऊ नये.

मा.सभापती :किती प्रकल्पाची कामे चालू आहे कोणत्या प्रकल्पाचे किती काम पुर्ण झाले.

कार्य.अभियंता(बीओटी) :स्वीमींगपूलचे, शहानुरवाडी , रेल्वेस्टेशन व सिध्दार्थ उद्यानातील काम पुर्ण झालेले आहे सिध्दार्थ उदयानातील पार्कींगची जागा ही महापालीकेचे कपाऊंड होते ते मिळाले आहे.

मा.सभापती :काम पुर्ण करण्याचा कालावधी किती होता.

कार्य.अभियंता(बीओटी) : येथील जागेचे 50% पजेशन दिले होते पार्कींगची जागा मिळत नव्हती म्हणून 50% पजेशन दिले नव्हते.पार्कींगची जागा दिली आहे. त्याचे टेंडर काढले पार्कींग चालू आहे.

मा.सभापती : ज्या कामाची मुदत संपली त्या बाबत दंडात्मक कार्यवाही का केली नाही .

कार्य.अभियंता (बीओटी):दंडात्मक कार्यवाही करण्याची प्रोव्हीजन आहे.

श्री.जगदीश सिध्द :आतापर्यंत किती दंड आकारला करारनाम्यात काय प्रोव्हीजन आहे.

मा.सभापती : जे बीओटीचे प्रकल्पाचे कामे दिली त्या संबधीची सर्व संचिका व काम करणारे ठेकेदार यांना दालनात चर्चा करण्यासाठी बोलवावे प्रकल्पाची माहिती आम्हाला समजावून सांगावी. त्यानुसार पुढील कार्यवाही करता येईल.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :लक्ष्मण चावडी ते एमजीएम रस्त्यावरील जागा बाधीत होत असलेली घरे हटविली त्यांना मोबदला दिला परंतु 4 लोकांची घरे रस्त्यामध्ये येत होती तीही काढली त्या मालकास अदयाप मोबदला दिला नाही.इतराप्रमाणे त्यांना ही मिळावा.तसेच या रस्त्यावरील अर्धवट काम पुर्ण करावे.

मा.सभापती :ज्याच्या जागा बाधीत झाल्या अशा किती लोकांना प्लॉट दिले पजेशन दिले.

सहा.संचालक न र :जे लोक प्लॉट साठी पात्र होते त्याचे तीन वेळेस सर्वे करून त्यांना हर्सुल सर्वे नं 216,217 मधे भुखंड वाटप केले.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :त्या ठिकाणी घरे बांधण्यासाठी रक्कम देणार काय ?

सहा.संचालक (न.र) :नगर रचना विभागाक्डून घर बांधकामासाठी शिफारस पत्र दिले बांधकामासाठी रक्कम देणे बाबत कार्य.अभियंता (बीओटी )हे काम पाहतात.

श्री.काशिनाथ कोकाटे :कुणालाही या आर्थीक लाभापासून वंचीत ठेवू नये .

मा.सभापती :लक्ष्मण चावडी ते एमजीएम या रस्त्यावरील बांधीत मिळकत धारकांना हर्सुल येथील शिल्लक प्लॉट वाटप करण्यात यावे.शहरातील व्हाईट टॉपींग व डिफर पेमेंन्टवर ज्या रस्त्याची कामे चालू आहे ती पुर्ण करावी.

कार्य.अभियंता(अ व ड) :या रस्त्याचे काम चालू आहे रस्त्यामध्ये 10-12 घरे येतात तेथे काम थांबले या संदर्भात कोर्ट प्रकरण होते माझ्या माहिती प्रमाणे कोर्टाचा निकाल लागलेला आहे.हे काम पुर्ण करण्या संदर्भात शहर अभियंता यांचे समवेत चर्चा केली. नगररचना विभागाची मदत घेवून योग्य तो मार्ग काढावा व काम करावे अशा सुचना मिळाल्या जेवढा रस्ता काम करण्यास उपलब्ध आहे ते काम होईल काही ठिकाणी जेसीबीने सपाटीकरण करण्यात येत आहे. काम चालू आहे.

मा.सभापती : वादग्रस्त मिळकत धारकाशी चर्चा करून रस्ता खुला करून घ्यावा या रस्त्याचे तातडीने काम करावे.

श्रीमती सत्यभामा शिंदे :उन्हाळा सुरू झाला. समांतर एजन्सी आल्यापासून पाणीपुरवठयाचे मुळीच नियोजन नाही.पाणी येत नाही त्या वेळेस नागरीक टँकरची मागणी करतात टँकरने पाणी देत नाही असे असतांना एकीकडे पाणीपट्टी पोटी 3050रू घ्यायचे व पाणी येणार नाही त्या दिवशी नागरीक पाणी विकत घेणार म्हणजे डबल रक्कम एजन्सी वसुल करीत आहे.हा नागरीकांवर अन्याय होत आहे.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :जे नागरीक पैसे भरतात त्यांना पाणी नाही उन्हाळा लागला पाण्याची गरज वाढणार आहे.तक्रारीची प्रशासन दखल घेत नाही. प्रशासन लक्ष देत नाही. करारनामा हा कंपनीच्या हिताचा केला कंपनीचे लोक ऐकत नाही.

मा.सभापती : मा.पालकमंत्री यांनी काय आदेश दिले खुलासा करावा

श्री.जगदीश सिध्द :मा.पालकमंत्री यांना करारनाम्याची प्रत दयावी.करारनामा केला त्या प्रमाणे काम व्हावे पाणी पुरवठा सुरळीत करावा. निर्णय घेण्यास हे सभागृह सक्षम आहे.

श्रीमती फिरदोस खान :समांतर जलवाहिनी संदर्भात दोन दिवस सर्वसाधारण सभा घेतली. कमेटी करण्याच्या निर्णय घेतला.कमेटी नियुक्त केली का केली असेल तर कमेटीने आतापर्यत काय निर्णय घेतला.

कार्य.अभियंता(अ/ड) :पाणीपुरवठया संबधी तक्रारीची दखल घेण्यासाठी वार्ड कार्यालयात अभियंता यांची नियुक्ती केली आहे तेथे तक्रारी दिल्यास त्या बाबत कार्यवाही करता येईल.

श्रीमती सत्यभामा शिंदे : जे त्या विभागात काम करण्यास इच्छूक नसतील त्यांच्या बदल्या कराव्यात .फोन केल्यास अधिकारी उचलत नाही.

कार्य.अभियंता(अ/ड) :आताच सुचना केल्याप्रमाणे खुलासा मागितला जाईल व त्याप्रमाणे कार्यवाही होईल.

श्री.संजय चौधरी :माझ्या वार्डात पिण्याच्या पाण्यात ड्रेनेजचे पाणी येते निदर्शनास आणून दिले अधिकारी एक दुस-याचे नाव सांगतात काम करीत नाही अशी परीस्थिती का निर्माण झाली.

मा.सभापती : जे अधिकारी काम करीत नसतील फोन घेत नसतील त्योची बदली करावी. आताच सुचना केल्याप्रमाणे ज्या भागात पाणी येत नाही अशा ठिकाणी टँकरने पाणी देण्याची व्यवस्था करावी.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी : गजानन महाराज मंदीर ते हेगडेवार रूग्णालय च्या पाठीमागील रस्त्यावर मोठे खड्डे पडले दोन दिवसात पॅचवर्कचे काम करणार होते अदयाप केले नाही.

कार्य.अभियंता(ई फ ) :सेव्हन हिल ते गजानन महाराज मंदीर पर्यत पॅचवर्क केले. दीड महिण्यापासून काम बंद आहे. काम सुरू होईल तेंव्हा या रस्त्याचे काम अगोदर केले जाईल.7-8 दिवसात काम होईल.

श्री.मीर हिदायत अली :वार्ड क मध्ये कोणत्या रस्त्यावर पॅचवर्क केले.

वार्ड अभियंता(क) :48 लक्षचे काम होते त्यात शहागंज चमन ते हिन्दी भवन विदयालय तेथून निजामोद्दीन दर्गा या रस्त्याचे पॅचवर्क केले.कैसर कॉलनी येथील रस्तावर पॅचवर्क केले इंदिरानगर येथील रस्ता केलेला आहे.90 टक्के काम केले काही काम बाकी आहे.बील देण्याची ठेकेदारानी मागणी केली.

श्री.मीर हिदायत अली :20 लक्षचे टेंडर होते 90 टक्के काम झाले नाही शहाबाजार येथील मस्जीद समोरील 20 मीटर रस्ता आहे.या भागातील स्मशानभुमीकडे जाणारा रस्ता आहे या रस्त्याचे काम केले नाही.

वार्ड अभियंता (क) :पुढील आठवडयात काम सुरू होईल.

मा.सभापती :आताच सुचना केल्या प्रमाणे शहाबाजार भागातील रस्त्याचे काम तातडीने करावे

श्री.मीर हिदायत अली :किराडपूरा ते राममंदीर रोषणगेट रस्त्यावरील दुभाजकांचा वाद चालू होता आता मार्कींग केली काम केंव्हा सुरू होणार आहे.

काय.अभियंता(अ-ड) :नगररचना विभागाने मार्कींग करून दिले. आता विभागाचे टीमवर्क व पोलीस संरक्षण घेवून काम सुरू करण्यात येइ्ल.

मा.सभापती :त्या रस्त्यावरील अतिक्रमण असेल ते काढावे पोलीस संरक्षण घ्यावे काम सुरू करावे.

श्री.मीर हिदायत अली :प्रोझोन मॉल कडे 6.25 ोटी थकबाकी असतांना 25 लक्षचा धनादेश घेतला कमर्शियल कर असेल तर 50 टक्के रक्कमे पेक्षा कमी रक्कम घेत नाही या प्रकरणात कमी रक्कम का स्विकारली.खुलासा करावा.

कर निर्धारक व संकलक:रू 6.30 कोटी थकबाकी होती.त्यापैकी 5.73 कोटी प्रोझोन त्याचा खर्च केलेला आहे शहर अभियंता यांचेकडून कळले.48 लक्ष थकबाकी आहे 25 लक्षचा धनादेश घेतला.

श्री.मीर हिदायत अली :अर्धा कि.मी. रस्त्यावर एवढा खर्च होऊ शकतो का या मालमत्तेचे कराचे रिव्हीजन केव्हा केले होते.या मालमत्तेस एक वर्षाचे रूपये 1,28,86000/- इतका टॅक्स आहे.

कर निर्धा.व संकलक :गेंल्या वर्षीच रिव्हीजन केले.रिवाईज कर केला त्यामूळे किमंत वाढली.अगोदर मायनस मध्ये होतो.खर्च जास्त व टॅक्स कमी असे होत होते.सन 2012-13 मध्ये रिव्हीजन केले.5.73 वजा जाता 48 लक्ष शिल्लक होते त्यातील 25 लक्ष धनादेश दिला उर्वरीत रक्कम लगेच मिळणार आहे.

मा.सभापती :5.73 कोटी खर्च करण्याचे अधिकारी कोणी दिले होते.

कार्य.अभियंता(श्री.सिद्दीकी):सर्वसाधारण सभेने करारनामा मंजूर केला त्यानुसार प्रायोगिक तत्वावर काम दिले होते त्यांची मागणी 16 कोटीचा प्रस्ताव होता एकूण 1100 रनिंग मिटरचा प्रस्ताव होता परंतु त्यांना 550 रनिंग मिटरची परवानगी दिली होती.5.73 कोटीचे ते काम झालेले आहे.

मा.सभापती :5.73 कोटी कशावर खर्च केले सविस्तर माहिती सदस्यांना दयावी.

**<u>विषय क्र. 94 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील महत्वांच्या ऐतिहासिक स्थळांसाठी पर्यटनाच्या दृष्टीने सोई-सुविधा उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने औरंगाबाद पर्यटन मेगा सर्किटचा प्रस्ताव महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळातर्फे केंद्र शासनाच्या पर्यटन मंत्रालयाकडे मान्यतेस्तव सादर करण्यात आलेला होता. या प्रस्तावास दिनांक 31/03/2013 च्या केंद्रीय पर्यटन मंत्रालयाच्या आदेशानुसार औरंगाबाद महानगरपालिकेसाठी र.रू.833.24 लक्ष एवढा निधी मंजुर झालेला आहे. सदरच्या अनुषंगाने हाती घ्यावयाच्या कामासंदर्भाने दिनांक 16/01/2014 रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेमध्ये प्रस्ताव क्रमांक 455 अन्वये ठराव मंजुर झालेला आहे.

उपरोक्त दर्शविल्यानुसार औरंगाबाद पर्यटन मेगा सर्कीट अंतर्गत पर्यटन स्थळांकडे जाणाऱ्या रस्त्यांचे दुभाजक व बेटांचे सुशोभिकरण करणे बाबतच्या कामाचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2013-2014 च्या दरसुचिनुसार रक्कम रूपये 77,65,692/- चे अंदाजपत्रक असुन सदरील कामाचा खर्च हा शासनाकडून प्राप्त निधीतुन प्रस्तावित आहे. सदर कामासाठी निविदा पत्रके मागविली असता, एकुण चार निविदा प्राप्त झाल्या असता, निविदा अटी व शर्तीमध्ये नमुद केल्यानुसार कागदपत्रांची पडताळणी केली असता, सर्व चारही निविदा धारक हे पात्र असुन त्यांचे व्यापारी दर उघडण्यात आले असुन त्या बाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 01. | मे.अशोक कन्स्ट्रक्शन ॲन्ड जे. व्ही. | अ.प.दरापेक्षा 23.23% कमी दराने |
| 02. | मे. सहरा कन्स्ट्रक्शन | अ.प.दरापेक्षा 21.01% कमी दराने |
| 03. | श्री शेख मोहमंद इब्राहीम | अ.प.दरापेक्षा 18.98% कमी दराने |
| 04. | मे. एल.के. कन्स्ट्रक्शन | अ.प.दरापेक्षा 14.99% कमी दराने |

वरीलप्रमाणे प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या म्हणजे सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 23.23% कमी दराची मे.अशोक कन्स्ट्रक्शन ॲन्ड जे.व्ही. यांची निविदा प्राप्त आहे.

तरी सदरील कामासाठी मे.अशोक कन्स्ट्रक्शन ॲन्ड जे.व्ही. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 23.23% कमी दराच्या निविदेचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा मंजुरीस्तव सादर.

मा.सभापती :केंद्र शासनाकडून निधी आलेला आहे त्यामूळे हे काम करणे आवश्यक आहे मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पर्यटन मेगा सर्कीट अंतर्गत पर्यटन स्थळांकडे जाणाऱ्या रस्त्यांचे दुभाजक व बेटांचे सुशोभिकरण करणेच्या कामासाठी प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 23.23% कमी दराची मे.अशोक कन्स्ट्रक्शन ॲन्ड जे.व्ही. यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 95 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2014-15 मधुन नाविण्यपुर्ण योजना अंतर्गत आमखास मैदान जवळील कमल तलावाचे सौंदर्यीकरण व विकसीत करणेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडील जा.क्र.जिनिस/प्रमा-निवि/जिवायो/2014-15/1683,दिनांक 14/08/2014 अन्वये र.रू.50.00 लक्ष च्या कामास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे. तत्पुर्वी सदर कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2013-14 च्या दरसूचिनुसार रक्कम रूपये 50,11,590/- चे अंदाजपत्रक असुन सदरील कामाचा खर्च हा जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत प्राप्त झालेल्या निधीमधुन प्रस्तावित आहे. या कामासाठी निविदा पत्रके मागविली असता, एकूण सात निविदा प्राप्त झाल्या असता, निविदा अटी व शर्तीमध्ये नमुद केल्यानुसार कागदपत्रांची पडताळणी केली असता,त्यापैकी एकुण सहा निविदा धारक हे पात्र असुन त्यांचे व्यापारी दर उघडण्यात आले असून त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 01. | मे.सहारा कन्स्ट्रक्शन | अ.प.दरापेक्षा 26.01% कमी दराने |
| 02. | श्री शेख मोहमंद इब्राहीम | अ.प.दरापेक्षा 20.70% कमी दराने |
| 03. | मे.ड्रीमलँड कन्स्ट्रक्शन | अ.प.दरापेक्षा 15.01% कमी दराने |
| 04. | मे.अशोक कन्स्ट्रक्शन | अ.प.दरापेक्षा 14.99% कमी दराने |
| 05. | मे. एल.के.कन्स्ट्रक्शन | अ.प.दरापेक्षा 14.86% कमी दराने |
| 06. | श्री.काझी गोहर मोहीनुद्दीन | तांत्रिकदृष्ट्या नाकारण्यात आले. |
| 07. | श्री.के.बी.पाथ्रीकर | अ.प.दरापेक्षा 13.25% कमी दराने |

वरीलप्रमाणे प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या म्हणजे सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 26.01% कमी दराची मे.सहारा कन्स्ट्रक्शन यांची निविदा प्राप्त आहे.

तरी सदरील कामासाठी मे.सहारा कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 26.01% कमी दराच्या निविदेचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा मंजुरीस्तव सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2014-15 मधुन नाविण्यपुर्ण योजना अंतर्गत आमखास मैदान जवळील कमल तलावाचे सौंदर्यीकरण व विकसीत करणेच्या कामासाठी प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 26.01% कमी दराची मे.सहारा कन्स्ट्रक्शन यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 96 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील महत्वांच्या ऐतिहासिक स्थळांसाठी पर्यटनाच्या दृष्टीने सोई-सुविधा उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने औरंगाबाद पर्यटन मेगा सर्किटचा प्रस्ताव महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळातर्फे केंद्र शासनाच्या पर्यटन मंत्रालयाकडे मान्यतेस्तव सादर करण्यात आलेला होता. या प्रस्तावास दिनांक 31/03/2013 च्या केंद्रीय पर्यटन मंत्रालयाच्या आदेशानुसार औरंगाबाद महानगरपालिकेसाठी रक्कम रूपये 833.24 लक्ष एवढा निधी मंजुर झालेला आहे. सदरच्या अनुषंगाने हाती घ्यावयाच्या कामासंदर्भाने दिनांक 16/01/2014 रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेमध्ये प्रस्ताव क्रमांक 455 अन्वये ठराव मंजुर झालेला आहे.

उपरोक्त दर्शविल्यानुसार औरंगाबाद पर्यटन मेगा सर्कीट अंतर्गत पर्यटन स्थळांकडे जाणाऱ्या रस्त्यांचे दुभाजक सुशोभिकरण करणे बाबतच्या कामाचे सा.बां. विभागाच्या सन 2013-2014 च्या दरसुची नुसार र.रू.1,81,65,550/- चे अंदाजपत्रक असुन सदरील कामाचा खर्च हा शासनाकडून प्राप्त निधीतुन प्रस्तावित आहे. सदर कामासाठी निविदा पत्रके मागविली असता, एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या असता, निविदा अटी व शर्तीमध्ये नमुद केल्यानुसार कागदपत्रांची पडताळणी केली असता, सर्व तीनही निविदा धारक हे पात्र असुन त्यांचे व्यापारी दर उघडण्यात आले असुन त्या बाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 01. | मे.अशोक कन्स्ट्रक्शन ॲन्ड जे. व्ही. | अ.प.दरापेक्षा 17.31% कमी दराने |
| 02. | मे. सहरा कन्स्ट्रक्शन | अ.प.दरापेक्षा 17.01% कमी दराने |
| 03. | मे. एल.के. कन्स्ट्रक्शन | अ.प.दरापेक्षा 14.99% कमी दराने |

वरीलप्रमाणे प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या म्हणजे सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 17.31% कमी दराची मे.अशोक कन्स्ट्रक्शन ॲन्ड जे.व्ही. यांची निविदा प्राप्त आहे.

तरी सदरील कामासाठी मे.अशोक कन्स्ट्रक्शन ॲन्ड जे.व्ही. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 17.31% कमी दराच्या निविदेचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा मंजुरीस्तव सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पर्यटन मेगा सर्कीट अंतर्गत पर्यटन स्थळांकडे जाणाऱ्या रस्त्यांचे दुभाजक सुशोभिकरण करणेच्या कामासाठी प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 17.31% कमी दराची मे.अशोक कन्स्ट्रक्शन ॲन्ड जे.व्ही. यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र. 97 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.07 मधील पेठेनगर, साकेतनगर येथील मंजुर रेखांकनातील रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.42,04,369/- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती ठराव क्र.05 दि.03/07/2014 अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे. मान्यतेनुसार सदरील कामाकरीता निविदा मागविण्यात आल्या असता ई-टेंडर विभागाच्या अहवालानुसार एकूण 03 कोऱ्या निविदा विक्री झाल्या व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत सदरील तीनही निविदा दर भरून प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा उघडण्यात आल्या असता त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 01. | मे.धनंजय कन्स्ट्रक्शन | 10.00% जास्त दराने |
| 02. | ए.एस.कन्स्ट्रक्शन | 11.89% जास्त दराने |
| 03. | के.बी.पाथ्रीकर | 14.77% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 10.00% जास्त दराची मे.धनंजय कन्स्ट्रक्शन यांची निविदा असून कंत्राटदाराने दिलेले दर जास्त वाटत असल्याने त्यांना सदरील

कामाचे दराबाबत वाटाघाटीस्तव बोलावले असता वाटाघाटीअंती त्यांनी सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10% जास्त या दराऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5% जास्त दराने करण्याची सहमती दर्शविली. परंतु सदरील काम संबंधीत कंत्राटदाराकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिली आहे.

तरी सदरील काम मे.धनंजय कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेणेबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

मा.सभापती :ऐनवेळचे प्रस्ताव दुरूस्ती सह मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.07 मधील पेठेनगर, साकेतनगर येथील मंजुर रेखांकनातील रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्याप्रमाणे सदरील काम अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 98 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.11, अंतर्गत विविध रस्त्याचे कॉंक्रीटींग/व्हाईट टॉपींग करणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2011-12 च्या दरसुची DSR नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक रक्कम रू.39,81,117/- यास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदरील कामाचा खर्च सन 2014-15 च्या अर्थसंकल्पातील कॉंक्रीट रस्ते या लेखाशिर्ष अंतर्गत उपलब्ध असलेल्या रक्कम रू.40.00 लक्षच्या तरतुद मधुन करण्यात येईल.

करीता सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.39,81,117/- मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.11, अंतर्गत विविध रस्त्याचे कॉंक्रीटींग/व्हाईट टॉपींग करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.39,81,117/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 99 :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करण्यात येतो की, बळवंत वाचनालय ते दिवाणदेवडी चौक या 15.00 मीटर रूंद विकास योजना रस्ता महानगरपालिकेतर्फे विकसीत करण्यात येत असून, नगर भुमापन क्रमांक 4599 व 4561 या मिळकती श्री.विजयेंद्र हिरालाल काबरा अध्यक्ष बळवंत मोफत वाचनालय, औरंगपुरा, औरंगाबाद व श्री.सुनिल मधुसुदन रानडे व इतर यांची आहे. विकास योजना रस्त्यात अनुक्रमे 46.00 चौ.मी. व 22.69 चौ.मी. क्षेत्र बाधीत होत आहे. सदर मिळकती या रस्त्याने बाधीत असल्याने रस्त्याने बाधीत क्षेत्राचा मोबदला रोख स्वरूपात मिळणेसाठी मिळकत धारकांनी मागणी केली आहे. त्यानुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 126 व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 77 अन्वये खाजगी वाटाघाटीने भूसंपादन करणे करीता मावेजा रक्कमेची खालीलप्रमाणे निश्चित करण्यास मा.आयुक्त महोदय यांची मान्यता झालेली आहे.

| अ.क्र. | मिळकत धारकांचे नांव | न.भु.क्र. | बाधीत क्षेत्र चौ.मी. | वि.यो. रस्त्याने बाधीत क्षेत्राचा मोबदला रक्कम | खरेदीसाठी लागणारी अपेक्षित रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 01. | श्री.विजयेंद्र हिरालाल काबरा अध्यक्ष बळवंत मोफत वाचनालय, औरंगपुरा औरंगाबाद | 4599 | 46.00 | 14,04,300/- | 98,000/- |
| 02. | श्री.सुनिल मधुसुदन रानडे व इतर | 4561 | 22.69 | 6,93,180/- | 49,000/- |

करीता बाधीत मिळकतधारक यांना त्यांना मावेजा देतेवेळी त्यांच्याकडून नोंदणीकृत खरेदीखत करून घेणे आवश्यक आहे. मा.सर्वसाधारण सभेने दिनांक 20/04/2012 रोजी पारीत केलेल्या ठराव क्रमांक 727 नुसार खरेदीखताचा संपूर्ण खर्च औरंगाबाद महानगरपालिका करणार असल्याने विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्राचा वरीलप्रमाणे मावेजा रक्कम व खरेदी खताच्या खर्चासह मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.विजयेंद्र हिरालाल काबरा, अध्यक्ष, बळवंत मोफत वाचनालय, औरंगपुरा, औरंगाबाद व श्री. सुनिल मधुसुदन रानडे व इतर यांच्या मिळकती नगर भुमापन क्रमांक 4599 व 4561 मधील अनुक्रमे 46.00 चौ.मी. व 22.69 चौ.मी. क्षेत्र बळवंत वाचनालय ते दिवाणदेवडी चौक या 15.00 मीटर रूंद विकास योजना रस्त्यात बाधीत होत असल्याने, सदर जागा खाजगी वाटाघाटीने भूसंपादन करण्यास तसेच खालील दर्शविल्याप्रमाणे भूसंपादनाची मावेजा रक्कम संबंधीतास अदा करण्यास व नोंदणीकृत खरेदी खताच्या खर्चासह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | मिळकत धारकांचे नांव | न.भु.क्र. | बाधीत क्षेत्र चौ.मी. | मोबदला रक्कम | खरेदी खतासाठीची अपेक्षित रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 01. | श्री.विजयेंद्र हिरालाल काबरा अध्यक्ष बळवंत मोफत वाचनालय, औरंगपुरा औरंगाबाद | 4599 | 46.00 | 14,04,300/- | 98,000/- |
| 02. | श्री.सुनिल मधुसुदन रानडे व इतर | 4561 | 22.69 | 6,93,180/- | 49,000/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 100 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहरातील विकास योजना मुख्य रस्त्याची सद्यस्थिती आजमितीस अत्यंत खराब झालेली असून रस्ते Non Motorable स्थितीत आहेत. अशा ज्या प्रमुख विकास योजना रस्त्यांची कामे मागील 8-10 वर्षापूर्वी करण्यात आलेली आहेत. या विकास योजना रस्त्यांची कामे तातडीने हाती घेणे आवश्यक असून त्याबाबतची यादी खालीलप्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **रस्त्यांचे नांव** |
|---|---|
| 01. | महानगरपालिका खडकेश्वर वाचनालय ते आय.टी.आय. भडकलगेट पर्यंतचा 9.00 मीटर रूंद विकास योजना रस्ता. |
| 02. | ज्युबलीपार्क ते मराठवाडा सांस्कृतिक मंडळ पर्यंत 12.00 मीटर रूंद विकास योजना रस्ता व लगतचा 6.00 मीटर रूंद समांतर रस्ता. |
| 03. | टाऊन हॉल नजीकचा फ्लाय ओव्हर खालील रस्ता चौक. |
| 04. | सिडको एन-6 आझाद चौक ते बजरंग चौक 18.00 मीटर रूंद रस्त्याचे व्हाईट टॉपींग पध्दतीने कॉंक्रीटींग करणे. |
| 05. | सिडको एन-7 हॉटेल सन ते ओंकार गॅसपर्यंत तसेच ओंकार गॅस ते अनिकेत हॉस्पीटल त्रिवेणी नगर पर्यंत 15.00 मीटर रूंद रस्त्याचे व्हाईट टॉपींग पध्दतीने कॉंक्रीटींग करणे. |
| 06. | संत तुकोबानगर येथील मुख्य रस्त्याचे काम. |
| 07. | पंचवटी चौक ते रेल्वेस्टेशन रस्ता. |
| 08. | गोपाळ टी चौक ते पीरबाजार रस्ता. |
| 09. | क्रांतीचौक ते महाविर चौक. |
| 10. | संत एकनाथ रंगमंदिर ते शहा कॉलनी रस्ता. |
| 11. | पहाडे कॉर्नर ते गजानन नगर (मातोश्री) चौक मुख्य रस्ता. |
| 12. | विजयनगर ते कालीकामाता मंदिर ते आर.बी. हिल्स गारखेडा. |
| 13. | कलेक्टर ऑफिस ते सलीम अली सरोवर रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे. |
| 14. | चौसरनगर ते महादेव मंदिर दशमेश नगर पर्यंतचा 15.00 मीटर रूंद रस्ता. |

उपरोक्त कामासाठी अंदाजीत रक्कम रूपये 30.00 कोटीचा खर्च अपेक्षित आहे. सद्या महानगरपालिकेकडे विविध विकास कामे सुरू आहेत, तसेच मनपा सार्वत्रिक निवडणूक 2015 च्या कामासाठी अनेक तांत्रिक कर्मचारी वर्ग करण्यात आले असल्यामुळे उपरोक्त कामे करण्यासाठी पुरेसा तांत्रिक कर्मचारी उपलब्ध होत नसल्याने या कामाच्या निविदा तयार करण्यासाठी म्हणजेच प्री टेन्डर व पोस्ट टेन्डर इत्यादी कार्यवाही करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) ची नियुक्त करणे आवश्यक आहे.

प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांचेकडून उक्त रस्त्याच्या कामाचे अंदाजपत्रके तयार करणे आणि निविदापूर्व कामे करणे, कामाचे आदेश दिल्यानंतर कामाचे गुणवत्ता बाबत कामावर देखरेख करणे, तांत्रिक मार्गदर्शन करणे, कामाचे मोजमाप घेणे व त्याची नोंद मोजमाप पुस्तिकेत घेणे, कामात वापरण्यात येणाऱ्या साहित्याची तपासणी करणे, इत्यादी निविदे नंतरची कामे करून घेण्यात येतील.

या सर्व कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांची नेमणूक करणेसाठी निविदा काढणे, त्यास मान्यता घेणे, यासाठी लागणारा कालावधी विचारात घेता व रस्त्यांची कामे तातडीने सुरू करणे बाबत मा.महापौर व स.पदाधिकारी यांचा सतत पाठपुरावा व आग्रह विचारात घेता सध्या कार्यरत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांचा विचार करून त्यांचेकडून वरील रस्त्यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांची नियुक्तीची निविदा न मागविता कामे करून घेणे शक्य आहे.

सध्या महानगरपालिकेच्या डिफर्ड पेमेंट कामावर तसेच विकास योजना रस्ता रूंदीकरणाच्या कामावर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणुन मे.देवगिरी कंन्सलटंट, औरंगाबाद हे अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 1.75% +Service Tax दराने काम करीत आहेत. यासाठी मा.सर्वसाधारण सभा दिनांक 21/03/2012 ठराव क्रं.668 नुसार मान्यता आहे. क्रांतीचौक ते रेल्वेस्टेशन या तेराव्या वित्त आयोगातील कामासाठी मे.क्रियेशन इंजिनिअर्स प्रा.लि. पुणे यांची अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 2.3% +Service Tax दराने नियुक्ती करण्यात आलेली आहे. यास देखील मा.सर्वसाधारण सभेची मान्यता प्राप्त आहे. तसेच सध्या शहरात चालु असलेल्या व्हाईट टॉपींगच्या कामासाठी मे.क्रियेशन इंजिनिअर्स प्रा.लि. पुणे तसेच मे.जगप्रयाग इन्फ्रा. प्रा.लि. मुंबई यांचेकडून कामाच्या अंदाजपत्रकीय दराच्या 1.5% +Service Tax या दराने काम करून घेण्यासाठीचा प्रस्तावास मा.सर्वसाधारण सभा व मा.स्थायी समिती सभेने मान्यता दिलेली आहे.

महानगरपालिकेच्या रस्त्याची सध्या दुरावस्था झाली असल्यामुळे नागरीकांचा असंतोष तसेच वृत्तपत्र यांनी देखील रस्त्याच्या दुरावस्थेबध्दल वेळोवेळी बातम्या प्रकाशित केल्या आहेत. मा.पालकमंत्री महोदय, औरंगाबाद यांनी दिनांक 08/01/2015 रोजी त्यांच्या पाहणीच्यावेळी महानगरपालिकेच्या रस्त्याच्या दुरावस्थेबध्दल नाराजी व्यक्त केलेली आहे. कामे तातडीने करणे आवश्यक असल्यामुळे PMC साठी निविदा काढणे यासाठी लागणारा वेळ विचारात घेता या प्रकरणी मा.महापौर व स.पदाधिकारी यांचेशी झालेल्या चर्चेनुसार जर उपलब्ध Project Management Consultants अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 1.5% +Service Tax या दराने सेवा देण्यास तयार असतील तर त्यांना ही कामे निविदा न मागविता देणेसाठी मा.सर्वसाधारण सभा व मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणेस्तव प्रस्ताव देण्याचे ठरले.

करीता उक्त कामाचे लाईन इस्टीमेट रक्कम रूपये 30.00 कोटीचे अंदाजपत्रक व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन मे.क्रियेशन इंजिनिअर्स प्रा.लि. पुणे तसेच मे.जगप्रयाग इन्फ्रा. प्रा.लि. मुंबई यांचेकडून कामाच्या अंदाजपत्रकीय दराच्या 1.5% +Service Tax या दराने काम करून घेण्यासाठीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेपुढे विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अ.क्र.01 ते 14 मध्ये नमूद केलेल्या रस्त्यांच्या कामासाठीचे उक्त कामाचे लाईन इस्टीमेट रक्कम रूपये 30.00 कोटीचे अंदाजपत्रक व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन मे.क्रियेशन इंजिनिअर्स प्रा.लि. पुणे तसेच मे.जगप्रयाग इन्फ्रा. प्रा.लि. मुंबई यांचेकडून कामाच्या अंदाजपत्रकीय दराच्या 1.5% +Service Tax या दराने काम करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 101 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिध्दार्थ उद्यान येथे औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत मराठवाडा मुक्ती संग्राम संग्रहालय उभारण्यात येत आहे. सदर प्रकल्पाचे काम जलदगतीने सुरू आहे. सदर प्रकल्पा करीता समिती गठीत करण्यात आली असून मा.स्थायी समिती ठराव क्र.24 दि.19/07/2014 नुसार श्री.सारंग टाकळकर यांची प्रथम तीन महिन्याकरीता दिनांक 01/08/2014 ते 31/10/2014 पर्यंत संशोधक समन्वयक म्हणुन नियुक्ती करण्यास मान्यता झालेली आहे.

प्रकल्प पुर्ण करण्यासाठी श्री.सारंग टाकळकर यांची नियुक्त फेब्रुवारी 2015 पर्यंत करणे आवश्यक आहे.

करीता दिनांक 05/11/2014 ते 28/02/2015 पर्यंत श्री.सारंग टाकळकर यांची संशोधक समन्वयक म्हणुन नियुक्ती करण्यास मान्यता व्हावी. त्यांना देय असलेले मानधन व इतर अटी व शर्ती मागील कराराप्रमाणेच कायम राहतील. करीता प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिध्दार्थ उद्यान येथे औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत उभारण्यात येत असलेल्या मराठवाडा मुक्ती संग्राम संग्रहालया करीता श्री.सारंग टाकळकर यांची संशोधक समन्वयक म्हणुन दिनांक 05/11/2014 ते 28/02/2015 पर्यंत नियुक्ती करण्यास मान्यता देण्यांत येते. तसेच त्यांना देय असलेले मानधन व इतर अटी व शर्ती मागील कराराप्रमाणेच कायम राहतील यासह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 102 :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे नियम 47 मधील नियम (1) चे (क) मधील तरतुदीनुसार मुख्य लेखापरीक्षक यांचे प्रदान अधिकारानुसार मुख्य लेखापरीक्षक प्रस्ताव सादर करतात की, श्री.ईश्वरचंद चुन्नीलाल कामेकर, कनिष्ठ लिपीक, लेखा परीक्षण विभाग यांनी त्यांचे वडील श्री.चुन्नीलाल आसाराम कामेकर यांचे (फ्रॅक्चर नेक फेमर) या आजारावर औषधोपचाराकरीता स्वतः रू.1,54,565/- (अक्षरी रू.एक लक्ष चोपन्न हजार पाचशे पासष्ट) खर्च केलेला असून त्यांनी सादर केलेल्या वैद्यकीय खर्चाचे देयके एकुण 1,54,565/- त्यापैकी अनुज्ञेय रक्कम रू.1,53,416/- च्या 90% रक्कम रू.1,38,074/- (अक्षरी रू.एक लक्ष अडतीस हजार चौऱ्याहत्तर रू. फक्त) दाखल केलेला खर्च देयकाच्या 5% रक्कम रू.7728.25/- (अक्षरी रू.सात हजार सातशे अठ्ठावीस पुर्णांक पंचवीस) मनपा फंडात जमा करून उर्वरीत रक्कम रू.1,30,346/- (अक्षरी रू.एक लक्ष तीस हजार तीनशे सेहचाळीस) एवढा वैद्यकीय खर्च केलेला आहे.

करीता रक्कम रू.1,38,074/- (अक्षरी रू.एक लक्ष अडतीस हजार चौऱ्याहत्तर) अदा करण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सविनय सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.ईश्वरचंद चुन्नीलाल कामेकर, कनिष्ठ लिपीक, लेखा परीक्षण विभाग यांनी त्यांचे वडील श्री.चुन्नीलाल आसाराम कामेकर यांचे (फ्रॅक्चर नेक फेमर) या आजारावर औषधोपचाराकरीता सादर केलेल्या वैद्यकीय खर्चाचे देयके एकुण 1,54,565/- त्यापैकी अनुज्ञेय रक्कम रू.1,53,416/- च्या 90% रक्कम रू.1,38,074/- (अक्षरी रू.एक लक्ष अडतीस हजार चौऱ्याहत्तर रू. फक्त) दाखल केलेला खर्च देयकाच्या 5% रक्कम रू.7728.25/- (अक्षरी रू.सात हजार सातशे अठ्ठावीस पुर्णांक पंचवीस) मनपा फंडात जमा करून उर्वरीत रक्कम रू.1,30,346/- (अक्षरी रू.एक लक्ष तीस हजार तीनशे सेहचाळीस) एवढा केलेला वैद्यकीय खर्च अदा करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 103 :**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सर्वसाधारण सभा ठराव क्र.546 दि.20/5/2014 अन्वये 13 वा वित्त आयोग निधी मधुन ट्रक माऊंटेड हेवी ड्युटी इंडस्ट्रीयल रोड स्वीपींग मशीन खरेदी करण्यासाठी रू.74,90,000/- (मशीन रू.60,75,000/- व चेसीस रू.14,15,000/- प्रमाणे) अंदाजपत्रकास मान्यता प्राप्त झालेली आहे.

मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेअंती "महानगरपालिकेने पुरवठा केलेल्या 16 जीव्हीडब्ल्यु चेसीसवर रोड स्वीपींग मशीन उभारून पुरवठा करणे" या कामासाठी जाहीर निविदा मागविण्यात आल्या. तसेच सदरील निविदेमध्ये तीन महिने कालावधीसाठी ऑपरेशन अॅन्ड मेंटेनन्स निविदाधारकाकडे ठेवण्याच्या अटीचा समावेश करण्यात आला. निविदा प्रक्रीयेअंती तीन निविदा प्राप्त झाल्या. मात्र पैकी दोन निविदा तांत्रिकदृष्ट्या अपात्र ठरल्या व एकमेव मे.टी.पी.एस.इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांची निविदा पात्र ठरल्यामुळे फेरनिविदा मागविण्यात आल्या. तिसऱ्या व अंतिम वेळी तांत्रिकदृष्ट्या पात्र मे.टी.पी.एस.इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांची व्यापारी निविदा उघडण्यात आली. मे. टी.पी.एस.इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांनी अंदाजपत्रकीय दर (रू.60,75,000/-) पेक्षा 6.56% जास्त दराने निविदा सादर केली आहे. तथापी वाटाघाटीअंती अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5% जास्त दराने सदरील काम करण्यास एजन्सीने सम्मती दर्शविली आहे. एजन्सीला तीन महिने मशिनचे ऑपरेशन अॅन्ड मेंटेंनन्स सांभाळावयाचे असल्यामुळे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5% जास्त दरास प्रशासकीय मंजुरी देवून मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

या रोड स्वीपींग मशीनद्वारे प्रतितास सर्वसाधारणपणे 4 ते 5 कि.मी. प्रमाणे प्रतिदिन 30 ते 40 कि.मी. रस्त्याची साफसफाई करणे शक्य होणार असुन या मशिनमध्ये व्हॅक्युम सिस्टीमद्वारे धुळ, कचरा कंटेनरमध्ये ओढून घेण्याची सुविधा असल्यामुळे मुख्य रस्त्यांवरील धुळीचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे. घनकचरा व्यवस्थापन नियम 2000 प्रमाणे कमीत कमी मनुष्यबळाचा वापर करून जास्तीत जास्त यांत्रिकी पध्दतीने घनकचरा व्यवस्थापनाचे काम करण्याच्या दृष्टीने रोड स्वीपींग मशीन खरेदी करणे योग्य होईल.

करीता मे. टी.पी.एस.इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांनी रोड स्वीपींग मशीनसाठी सार केलेली अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5% जास्त दराची निविदा मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे 13 वा वित्त आयोग निधी मधुन ट्रक माऊंटेड हेवी ड्युटी इंडस्ट्रीयल रोड स्वीपींग मशीन खरेदी करण्यासाठी "महानगरपालिकेने पुरवठा केलेल्या 16-जीव्हीडब्ल्यु चेसीसवर रोड स्वीपींग मशीन उभारून पुरवठा करणे" या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तांत्रिकदृष्ट्या पात्र निविदाधारक मे.टी.पी.एस.इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्याप्रमाणे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5% जास्त दराने स्वीपींग मशीन खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**(महबूबखॉ पठाण)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद